Indian Council of
Social Science Research

## भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली
## आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

आयोजित

## दोन दिवसीय जनजातीय गौरव राष्ट्रीय परिसंवाद

# भारतीय इतिहास लेखन : मध्य प्रांतातील जनजातीय योगदान

**५ व ६ ऑगस्ट,२०२५**




### बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (ICSSR) यांच्या संयुक्त विद्यमाने

**स्थळ : नवीन सभागृह, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली (महाराष्ट्र)**

**आयोजक : पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग आणि आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

Indian Council of Social Science Research

# भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली
# आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली


## दोन दिवसीय जनजातीय गौरव राष्ट्रीय परिसंवाद

# भारतीय इतिहास लेखन : मध्य प्रांतातील जनजातीय योगदान

## ५ व ६ ऑगस्ट,२०२५

**बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (ICSSR) यांच्या संयुक्त विद्यमाने**

**पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग आणि आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा आयोजित**




आदिवासी परंपरा, मौखिक इतिहास, प्रतिकार चळवळी, आणि पर्यावरणकेंद्रित जीवनशैली या गोष्टी भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. परंतु भारतीय इतिहासाच्या लेखनामध्ये आदिवासी समाजाचे स्थान अतिशय महत्त्वाचे असूनही, त्यांच्या संघर्षाचे, बलिदानाचे आणि योगदानाचे पुरेसे दस्तऐवजीकरण मुख्य प्रवाहात आलेले नाही. भारताच्या ऐतिहासिक घडामोडींमध्ये आदिवासी समाजाने स्वातंत्र लढ्यात, सामाजिक न्याय, पर्यावरणासंवर्धन व सांस्कृतिक समृद्धी यामध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. विशेषतः मध्य भारतातील प्रदेश - छत्तीसगड, मध्यप्रदेश, विदर्भ, तेलंगाना आणि झारखंड येथील जनजाती समूहांनी ऐतिहासिक क्रांतीसाठी आपले सर्वस्व अर्पण केले. याच पार्श्वभूमीवर, आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (ICSSR) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'जनजातीय गौरव राष्ट्रीय परिसंवादामध्ये आपण जनजाती समाजाच्या ऐतिहासिक योगदानाचा विविध अंगांनी मागोवा घेणार आहोत. बिरसा मुंडा हे स्वातंत्र सैनिक आहेतच शिवाय सामाजिक परिवर्तनाचे आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक होते. त्यांचे विचार आणि संघर्ष आजही प्रेरणादायी आहेत.

या चर्चासत्राचा मुख्य उद्देश जनजातीय समुदायाच्या ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय योगदानाचे मध्य प्रांतातील विशेष संदर्भात व्यापक मूल्यांकन करणे हा आहे. विविध विषयतज्ञ, अभ्यासक, संशोधक आणि सामाजिक कार्यकर्ते या विचारपीठावर एकत्र येऊन इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण योगदानाला प्रकाशात आणणे हा आहे.

### 🎯 परिसंवादाची उद्दिष्टे

- भारताच्या इतिहास आणि संस्कृतीच्या घडणीत आदिवासी समुदायांच्या अमूल्य योगदानाची ओळख पटवणे आणि त्यांचा गौरव करणे.
- आदिवासी वारसा, परंपरा, साहित्य, कला, आणि सामाजिक संघर्ष यावर सखोल चर्चा करण्यासाठी तसेच ज्ञान सामायिक करण्यासाठी विद्वान, संशोधक आणि विद्यार्थ्यांना एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
- आदिवासी संस्कृतींचे जतन, संवर्धन आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्या करीता व्यापक जनजागृती घडवून आणणे.
- आदिवासी साहित्य क्षेत्रात आंतरविद्याशाखीय संशोधनाला आणि शैक्षणिक सहकार्याला प्रोत्साहन देणे.



## गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ हे चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यरत आहे. जरी या क्षेत्राला भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती स्थान प्राप्त असले, तरी शैक्षणिक -आर्थिक मागासलेपणा आणि नक्षलग्रस्त अस्थिरता यांमुळे ते अनेकविध आव्हानांना सामोरे गेले आहे. या समस्यांची मुळे मुख्यतः शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या अभावात दडलेली आहेत. विद्यापीठ या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण, समावेशक आणि परिणामकारक उपक्रमांद्वारे (Gross Enrollment Ratio) वाटचाल करीत आहे.

### विद्यापीठ उपक्रम:

- विद्यापीठ परीसरातील सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण व वसतिगृह सुविधा.
- वीर बाबुराव शेडमाके कमवा व शिका योजना
- एकल: ग्रामसभा सक्षमीकरण प्रकल्प द्वारे ग्रामसभा वन उत्पादनांवर व कायदयांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम.
- मॉडेल पदवी महाविद्यालयांमध्ये रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची अंमलबजावणी.
- STRC द्वारे बांबू व संबंधित तंत्रज्ञानामध्ये युवकांसाठी कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम.
- गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी संस्कृती व इतिहासाच्या दस्तऐवजीकरणासाठी संशोधन शिष्यवृत्ती कार्यक्रम.
- गोंडी व माडिया भाषा संवर्धन आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम.
- गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांतील आदिवासी क्षेत्राशी संबंधित विविध शासकीय योजनांचे मूल्यमापन आणि नवीन धोरण तयार करण्याच्या उद्दीष्टांने CoPRA (Centre of Policy Research and Advocacy) स्थापना.
- 'विद्यापीठ आपल्या गावात' पदवी शिक्षण उपक्रम.

## पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील पदव्युत्तर इंग्रजी विभाग (PGTD) ची स्थापना २०१२ मध्ये करण्यात आली असून, हा विभाग चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांतील आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण वाढविण्याच्या उद्देशाने, शैक्षणिक उत्कृष्टता आणि सामाजिक सक्षमीकरणाचा एक महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू म्हणून कार्यरत आहे. विभागाने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत. यामध्ये "Know Age Series" अंतर्गत पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ६० हून अधिक ऑनलाईन व्याख्याने यशस्वीपणे आयोजित केल्या असुन,विद्यार्थ्यांना स्थानिक आदिवासी जीवनशैली व संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव देणारा " Community Outreach Programme" हा उपक्रमही विशेषत्वाने राबवण्यात आला आहे.

विभाग राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP-2020) अनुषंगाने इंग्रजी अभ्यासक्रम विकास, कौशल्यविकास कार्यशाळा, तसेच शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवतो. याचबरोबर, विभागाने Hornby Trust (UK), Vyatka University (Russia) यांसारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्य करून विविध परिसंवाद, अभ्यासक्रम आणि सहशोध प्रकल्प प्रभावीपणे राबवले आहेत. आज शिक्षण, संशोधन आणि सामाजिक भान यांचा समतोल राखणारे उपक्रम व एकात्मिक शैक्षणिकतेचे उदाहरण म्हणून विभाग कार्य करीत आहे

## आदिवासी अध्यासन केंद्र

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत आदिवासी अध्यासन केंद्र हे आदिवासी संस्कृती, इतिहास, भाषा आणि स्थानिक ज्ञान प्रणालींचे दस्तऐवजीकरण, जतन आणि संवर्धनासाठी समर्पित संशोधन केंद्र म्हणून कार्यरत आहे. केंद्राद्वारे गोंडी व माडिया या स्थानिक आदिवासी भाषांच्या संकलनावर आधारित सात दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, लुप्त होत चाललेल्या आदिवासी भाषांच्या संवर्धनाच्या उद्देशाने दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद यशस्वीरित्या आयोजित केली आहे.

भारतीय इतिहासातील आदिवासी जननायक व क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वांवरील व्याख्यानमालिका, तसेच आदिवासी संस्कृती आणि इतिहास विषयक कार्यशाळांचे आयोजनही केंद्राद्वारे सातत्याने केले जाते. सत्र २०२५ पासून गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये गोंड, माडिया, कोलाम व कंवर या प्रमुख आदिवासी जमातींच्या इतिहास व संस्कृतीच्या दस्तऐवजीकरणासाठी संशोधन फेलोशिप कार्यक्रम राबवण्यात येत आहे. याशिवाय, केंद्राद्वारे महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी कार्यशाळा आयोजित केल्या जात असून, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांतील आदिवासी क्षेत्राशी संबंधित विविध शासकीय योजनांचे मूल्यमापन आणि नवीन धोरण तयार करण्यासाठी सहकार्य करण्यात येते. या उद्देशासाठी केंद्राने CoPRA (Centre of Policy Research and Advocacy) या विभागाची स्थापना केली आहे.

# मार्गदर्शक



**पद्मश्री जागेश्वर यादव**
जनजातीय कार्यकर्ता आणि प्रोफेसर ऑफ प्रक्टिस, पं. रविशंकर शुक्ल विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगड



**डॉ. चित्तरंजन भोई**
अधिष्ठाता, स्कुल ऑफ कम्प्यरिटीव ट्रायबल लँग्वेज & लिटरेचर, कलिंगा सामाजिक विज्ञान संस्था, भुवनेश्वर, ओडीसा



**श्री.वैभव सुरंगे**
युवा कार्य प्रमुख
अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, दिल्ली



**डॉ. श्याम कोरेटी**
अधिष्ठाता,मानव विज्ञान, विद्याशाखा , रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपुर



**डॉ. देवाजी तोफा**
जनजातीय व सामाजिक कार्यकर्ता
लेखा मेंढा, गडचिरोली



**डॉ. पलाश कुमार नाथ**
भाषा आणि भाषाशास्त्र विभाग
अनुंदोराम बोरूआ भाषा, कला आणि संस्कृती संस्था (ABILAC) गुवाहाटी, आसाम

## 📅परिसंवाद सत्र

### पहिला दिवस : ५ ऑगस्ट २०२५

९:०० वा : नोंदणी

११:०० ते ११:३० – उद्घाटन सत्र

११:३० ते ०१:०० - सत्र १: बीज भाषण - बिरसा मुंडा: भारतीय इतिहास लेखन : मध्य प्रांतातील जनजातीय योगदान : श्री. वैभव सुरंगे, युवा प्रमुख, वनवासी कल्याण आश्रम दिल्ली.

०१:०० ते ०२:०० – सत्र २: भारताच्या इतिहास आणि संस्कृतीच्या जडणघडणीत बीरहोर ( छत्तीसगड) जनजातीय योगदान : पद्मश्री प्रा. जोगेश्वर यादव, प्रोफेसर ऑफ प्रक्टिस, पं. रविशंकर शुक्ल विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगड

०२:३० ते ४:०० – सत्र ३: मध्य भारतातील गोंड जनजाती उठाव डॉ. श्याम कोरटी, अधिष्ठाता, (मानव विज्ञान), रा.तु.म. विद्यापीठ, नागपूर

४:०० ते ५ :०० – सत्र ४: जनजातीय भाषा: उत्तरपूर्व भारतातील दृष्टीकोन: डॉ. पलाश कुमार नाथ, भाषा आणि भाषाशास्त्र विभाग, गुवाहाटी, आसाम

६:०० ते ०८:०० - सांस्कृतिक कार्यक्रम

### दुसरा दिवस : ६ ऑगस्ट २०२५

९ :३० ते ११:३० – सत्र ५: शोधनिबंध सादरीकरण

११:३० ते १२:०० - सत्र ६: रिसर्च फेलोशिप सादरीकरण: आदिवासी अध्यासन केंद्र , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

१२:०० ते ०१:३० – सत्र ७: बिरसा मुंडांचा अमर वारसा: नव्या भारताची प्रेरणा : डॉ. चित्तरंजन भोई, अधिष्ठाता, School of Comparative Tribal Languages, KISS-DU.

०१:३० ते २:०० – सत्र ८: चर्चासत्र -आदिवासी संस्कृती व इतिहास दस्तऐवजीकरण. डॉ. देवाजी तोफा, जनजातीय व सामाजिक कार्यकर्ता, लेखा मेंढा, गडचिरोली (महाराष्ट्र)

२:०० ते २:३० – समारोप सत्र

### 📝 नोंदणी

परिषद नोंदणी लिंक:
https://forms.gle/rBKP9KhMzMcCo6RA6

अध्यक्ष
**डॉ. प्रशान्त बोकारे**
मा. कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रमुख उपस्थिती
**डॉ.श्रीराम कावळे**
मा. प्र-कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विशेष उपस्थिती
**डॉ.अनिल हिरेखण**
मा. कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**डॉ.शाम खंडारे**
अधिष्ठाता, मानव्यविज्ञान
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

### आयोजन समिती

**डॉ. वैभव मसराम**
समन्वयक , जनजातीय गौरव परिषद

**प्रा. विवेक जोशी**
विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग

**डॉ. शिल्पा आठवले**
सहायक प्राध्यापक,
पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग

**डॉ.प्रमोद जावरे**
सहायक प्राध्यापक,
पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग

**डॉ. अतुल गावस्कर**
सहायक प्राध्यापक,
पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग

मा.सदस्य, सल्लागार मंडळ, आदिवासी अध्यासन केंद्र

पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग आणि
आदिवासी अध्यासन केंद्र
पत्ता: गोंडवाना विद्यापीठ, MIDC रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५, महाराष्ट्र, भारत
Website: https://unigug.ac.in/
E Mail: pgtdenglishgug@gmail.com